॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी दि. (३०) - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळेत साहित्य सृजन अंतर्गत 'मायबाप' विशेषांकाच्या भित्तिपत्रिकेचे विमोचन बिजलाई पगारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाषा प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

आधुनिक काळात मध्यमवर्गीय समाजाच्या व कुटुंबाच्या परिभाषा नेहमीच बदलणाऱ्या असल्या तरी आई-वडिलांचे महत्त्वपूर्ण स्थान हे कधीही बदलू शकत नाही. आपण यशाचे कितीही शिखर गाठले तरी आई वडिलांचे संस्कार हे कधीही विसरू नये असा मोलाचा संदेश देत या विशेषांकातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी असा आशावाद यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

या प्रसंगी प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी विविध भाषेतील कवींच्या कवितांचे वाचन केले. यात विद्यार्थ्यांनी वा. ना. आंधळे यांची 'आई' कविता चेतना शिंदे या विद्यार्थिनीने वाचली, 'आई' विषयक ओव्या हर्षदा महाजन हिने सादर केल्या, प्रज्ञास्पंदनेचे सौंदर्यशास्त्र या पुस्तकातील 'बाप' ही अर्पण पत्रिका संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील यांनी सादर केली, तसेच याच अर्पण पत्रिकेचा हिंदी अनुवाद प्रवीण गावित यांनी सादर केला, बा तथागता या विशाल काव्याची मराठी अर्पण पत्रिका स्वप्निल जाधव, हिंदी अनुवाद स्नेहा गायकवाड, इंग्रजी अनुवाद तेजस्विनी सुर्वे तसेच अहिराणी अनुवाद भाग्यश्री लाखे या विद्यार्थिनीने सादर केला. डिगिंग इंग्रजी कविता प्रांजली जोशी सोबतच रवींद्रनाथ टागोर यांची 'याद आना' या कवितेचे सादरीकरण गायत्री वाळवी या विद्यार्थिनीने केले. यावेळी मोठ्या संख्येने भाषा विद्यापीठातील विविध प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव प्रतिनिधी दि. (३०) - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेतर्फे आज विद्यापीठ परिसरात प्राणवायू देणाऱ्या वृक्षांचे रोपण विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी वड, पिंपळ व उंबर यासारख्या प्राणवायू वृक्षांचे विचारधारा प्रशाळेच्या परिसरासह महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राच्या समोरील परिसरात सदर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विचारधारा प्रशाळेचे चंद्रकांत वानखेडे, गौरव हरताळे, अनिल बिऱ्हाडे, योगेश चौधरी, किरण पाटील आदी उपस्थित होते.

**बातमी नं. ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३० :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सहायक कुलसचिव भाऊराव सोनवणे हे आज विद्यापीठ सेवेतून निवृत्त झाले. विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्था (युआयसीटी) येथील सहायक कुलसचिव भाऊराव सोनवणे हे नियत वयोमानानूसार विद्यापीठाच्या सेवेतून सेवा निवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी यांना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत निरोप देण्यात आला. सत्कारार्थी यावेळी सहकुटूंब उपस्थित होते. यावेळी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी संघटना, मागासवर्गीय कर्मचारी संघटना व उमवि पतपेढीच्या वतीने सेवानिवृत्त होत असलेल्या अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

.....................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३० ऑगस्ट, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता